
धक्का!!
सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. ५ एप्रिल २०२४ । पान १२



# तेलुगु भाषिक मतदारांसाठी काँग्रेस, भाजपाची रस्सीखेच



**लोकसभेला मतदान करणारा तेलुगू भाषिक 'हा' समाज**

पद्मशाली, मोची, कुरुहिनशेट्टी, तोगटवीर, तेलुगु सोनार, तेलुगू नाभिक, तेलुगू परीट, निलगार, निलकंठ, वडार, कटारी आदी.

**सोलापूर : निवडणूक कोणतीही असो लोकसभा वा विधानसभा. तेलुगु भाषिकांच्या साधारण पाच लाखांच्या या व्होट बँकेकडं निवडणुकीमधील प्रमुख काँग्रेस आणि भाजप या पक्षांचं लक्ष असतंच. लोकसभेच्या या निवडणुकीवेळीदेखील ते आहेच. या भाषिकांच्या मतांचं पाठबळ आपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या पाठिशी लागण्यासाठी काँग्रेस आणि भाजप यांचे प्रयत्न सुरु आहेत. तसं पाहिलं तर लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच या दोन्ही पक्षांनी निवडणुकीची मोर्चेबांधणी या मतदारांमध्ये केली आहे, पण अत्यंत संघर्षमय टप्प्यावर जाणाऱ्या सोलापूर लोकसभेच्या या निवडणुकीत तेलगु भाषिक मतदार आपल्या मताचं दान कोणाच्या पदरात टाकणार याकडं लक्ष लागलं आहे. तेलगु भाषिकांमध्ये आजवर काँग्रेस आणि भाजप हा फॅक्टर चालला आहे. या भाषिकांची मतं खेचून घेण्यासाठी आमदार प्रणिती शिंदे आणि आमदार राम सातपुते यांच्यामध्ये रस्सीखेच लागणार आहे.**



### 'मध्य'मधील मतदारांमध्ये प्रणितींची क्रेझ

सोलापूर शहर मध्य या विधानसभेच्या मतदार संघात साधारण ४० ते ५० हजारांहून अधिक मोची समाजाचे मतदार आहेत. या मतदार तीन टर्म आमदार प्रणिती शिंदे यांच्या पाठिशी आहेत. या मतदारांमध्ये आजही त्यांचीच क्रेझ आहे. होम पीच मतदार संघातून प्रणितींना या समाजाचं लोकसभेला मताचं चांगलं पाठबळ मिळू शकतं असं मानलं जातं.

### शमलेलं 'बीआरएस'चं वारं; पांगलेले मतदार

सोलापुरातील तेलुगु भाषिकांनं आपलसं वाटणारं 'बीआरएस'चं वादळ काही महिन्यांपूर्वी सोलापुरात चांगलंच घोंगावलं. या पक्षाच्या गुलाबी झेंड्याखाली तेलुगु भाषिक एकवटू लागले होते. मात्र, बीआरएसएसचं घोंगावणारं वादळ पूर्णपणं शमलं आहे. या पक्षाचं लोकसभेला काहीच दिसत नाही. 'बीआरएस'च्या झेंड्याखाली आता कोणी मतदार राहिले नाहीत. लोकसभेला ते आपल्या विचारानुसार मतदार करतील असं वातावरण आहे.

### श्रीरामचा नारा कायमच

तेलुगु भाषिक धार्मिक प्रवृत्तीचे आहेत. साधारण ७० टक्यांहून अधिक लोक संघ परिवाराशी जुडलेले आहेत. युवक मोठ्या संख्येनं संघ परिवारात आहेत. त्यांच्यामध्ये भाजपबद्दल सहानुती आहे. श्रीरामाचा नारा आहे. भाजपाच्या झेंड्याखाली असलेले हे मतदार आपल्याकडं वळविण्याचं आव्हान महाविकास आघाडीकडं असणार आहे.



सोलापूर शहर मध्य तसेच अक्कलकोट, दक्षिण सोलापूर या ठिकाणी मोची समाज मोठ्या संख्येनं आहे. मंगळवेढा आणि मोहोळ या तालुक्यात अल्प प्रमाणात हा समाज विस्तारलेला आहे. एकूण सहा लाखांपर्यंत लोकसंख्येच्या या समाजाचे मिळून साधारण एक ते सव्वा लाख मतदार सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात आहेत. मोची समाजाचा हा मतदार आजवर काँग्रेसच्या पाठिशी राहिला आहे. लोकसभेच्या या निवडणुकीवेळीदेखील हा समाज काँग्रेस पर्यायाने महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांच्या बाजूनेच उभा राहील. तेलंगणसह अन्य राज्यात हा समाज भाजपसोबत गेला असला तरी सोलापूर लोकसभेच्या मतदार संघामधील हा समाज काँग्रेससोबत राहणार आहे.

**-संजय हेमगड्डी, माजी महापौर तथा मोची समाजाचे नेते**



प्रत्येक लोकसभेच्या निवडणुकीवेळी भाजप उमेदवाराच्या पाठिशी उभा राहणाऱ्या तेलुगु भाषिकांना केंद्रस्थानी ठेवून मोठा विकास साधण्यात आला आहे. तेलुगु भाषिकांची विणकर महामंडळ स्थापन करण्याची मागणी भाजप सरकारनं पूर्ण केली. पूर्व भागात पदमशाली आणि हिंदू समाजासाठी साधारण रस्ता आणि स्मशानभूमीची उभारणी ६ कोटी ८० लाखातून केली. अत्यंत महत्वाचा रस्त्याचा आणि स्मशानभूमीचा प्रश्न सोडविला. तेलुगु भाषिकांच्या पूर्व भागात मुख्य शौचालयासह सर्व मुलभूत सुविधा पुरविल्या. रे नगरमधील मुलभूत सुविधांसाठी ३०० कोटींचा निधी देऊन तेलुगु भाषिकांना न्याय दिला. तेलुगु भाषिकांसाठी मोठा निधी देऊन विकास साधला आहे. तेलुगु भाषिक हे सरकारवर खुष आहेत. लोकसभेला मोठं मताधिक्य भाजप उमदेवाराच्या पाठिशी लागणार आहे.

**- रामचंद्र जन्नू, ज्येष्ठ नेते भाजप, सोलापूर**

## तौल-मौल के बौल...



गद्दारांना आतापासूनच केलेल्या कामाची 'फळे' मिळत आहेत. यवतमाळ, नाशिक आदी ठिकाणचे पाच विद्यमान खासदार अगोदरच बाद झाले. बुलढाण्यासह बाकीच्यांना जनता जनार्दन धडा शिकवणार हे उघड आहे. मूळ, निष्ठावानांच्या शिवसेनेचाच विजय होणार आहे. याचे कारण, 'बाप तो बाप होता है, ओरिजनल तो ओरिजनल होता है,' हे तेवढेच खरे. भाजपवाले टेंभी नाक्याकडे वाटाघाटीसाठी आले नाही तर त्यांना मुजरा, कुर्निसात करण्यासाठी दिल्लीला पाचारण करण्यात आले. हे एवढ्यावरच थांबणार नसून निवडणुकीत मतदार गद्दारी करणाऱ्यांची धूळधाण करणार आहेत.



**–सुषमा अंधारे**
उपनेत्या, शिवसेना ठाकरे गट



# 'शॉक' उमेदवारी नाकारण्याचा; 'झटका' वीज पुरवठा खंडितचा

**अकलूज : लोकसभेचा उमेदवार जाहीर करणं आता अंतिम टप्प्यात आलं आहे. ऐनवेळी उमेदवारी नाकारल्यानं पक्ष श्रेष्ठींकडून इच्छुकांना 'जोर का झटका धीरसे लगा' असं झालं तर दुसरीकडं जिल्ह्यात भीमा नदीचा शेतीपंपांचा वीज पुरवठा कपात करुन बळीराजाला उन्हाळ्याच्या होरपळीत प्रशासनानं शॉक दिला. वास्तविक या गोष्टी वेगवेगळ्या असल्या तरी झटका दिल्याच्याच आहेत. ज्याचा बाशिंग बांधून लोकसभा निवडणुकीच्या बाहुल्यावर चढणाऱ्यांना त्रास होणार आहे, त्याचप्रमाणं उन्हाळात कमी पाण्यावर पीक जोपासणाऱ्या बळीराजाला होणार आहे. दिलेल्या शॉकची दाहकता आणि त्रास मात्र वेगवेगळ्या स्वरुपाचा असणार आहे.**



सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशाने महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीने काही दिवसांपूर्वी भीमानदी काठावरील शेतीपंपाच्या वीजेची वेळ दिवसाकाठी चार तास इतकी केली आणि अगोदरच दुष्काळामुळे मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्याला महावितरणने वीज कपातीचा ऐन उन्हाळ्यात शॉक दिला. तर निवडणुकीच्या हंगामात मतांचे भरघोस पीक पदरात पाडून घेणाऱ्या कैक इच्छुकांना मात्र नेत्यांनीच उमेदवारीच्या नकाराचा झटका दिला.

सध्या दुष्काळसदृश्य परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रासह माढा मतदारसंघातसुद्धा निर्माण झाली आहे. अशातच शेतीपंपाच्या वीजेची वेळ ४ तास केल्यामुळे शेतातील उभी पिके जळून जाऊन शेतकऱ्यांसमोर अडचणी वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत शासन मात्र राजकीय आखाड्यात व्यस्त दिसत आहे.

भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांची वीज बंद करून जर शेतकऱ्यास आत्महत्या करण्यास प्रशासन प्रवृत्त करीत असेल तर यासारखी दुर्दैवी गोष्ट नाही. भीमानदी काठावर माळशिरस तालुक्यात कोणत्याही प्रकारची पाणी पुरवठा योजना नाही किंवा दुष्काळासाठी कोणत्याही प्रकारचे पाण्याचे टँकर चालू नाहीत सध्यस्थितीत भीमा नदीमध्ये शिल्लक राहणारे पाणी भाष्पीभवन होऊन संपू शकते त्यामुळे ते पाणी शेतकऱ्यांच्या उपयोगी तरी यावे यासाठी भिमा नदीकाठी तात्काळ ८ तास किंवा किमान ६ तास तरी विद्युत पंपाची वीज चालू करावी अशी शेतकऱ्यांतून मागणी होत आहे.

असे असतानाच 'आधीच दुष्काळ, त्यात निवडणुका ' अशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली आहे.माढा मतदारसंघ या ना त्या कारणाने सध्या गाजतोय. यंदा मान्सून कधी बरसणार हे जरी माहीत नसले तरी, आश्वासनांची खैरात आणि वचनांचा पाऊस मात्र लवकरच बरसण्याची चिन्हे दिसत आहेत. असो एकीकडे महाराष्ट्रात शेतकरी, शेतकऱ्यांच्या समस्या, शेतीपंपाची वीज, दुष्काळ या प्रश्नांनी डोके वर काढले असून सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी देखील या समस्यांना सामोरे जात आहेत. अशातच लोकसभा निवडणूक,इच्छुक, उमेदवारी,पक्ष, आचारसंहिता, चिन्ह अशा गोष्टींचे मात्र भरघोस पीक ऐन उन्हाळ्यात आपल्याला पाहायला मिळणार हे मात्र नक्की.



सद्या लोकसभेच्या निवडणुकीचे वारे वाहत आहे. या निवडणुकीच्या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकरी व त्याच्या समस्याकडे पाहण्यास थोडा देखील वेळ नाही. हेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री ओरडून सांगतात हे सरकार जनतेच सरकार आहे. हे शेतकऱ्यांचं सरकार आहे. मग शेतकऱ्यांची शेतीची वीज कमी करून चार तास इतकी का करण्यात आली? शासनकर्त्यांना भिमा नदीकाठावरील शेतकऱ्यांचा आक्रोश ऐकायला येत नाही का?

**- गणेश इंगळे, युवा सेना जिल्हा प्रमुख**



किस्से प्रचाराचे

# लातूरचा भूकंप अन् राजा

प्रमोद महाजन आणि गोपिनाथ मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर बेफाम आरोप करून प्रचाराचे रान पेटवले होते. भूखंड घोटाळा, भूकंपग्रस्त मदत घोटाळा असे अनेक आरोप त्यांच्यावर करण्यात आले. त्याला फारसे उत्तर पवारांनी कधी दिले नाही. मात्र, एकदा सोलापूरच्या सभेत ते म्हणाले, लातूरचा भूकंप मी घडवलाय असा एकच आरोप भाजप नेत्यांनी करायचा बाकी ठेवलाय! त्यावर प्रत्यूत्तर महाजन यांनी पुण्यातील सभेत दिले, ते म्हणाले, चाणक्याने सांगितलंय राजा लबाड असेल तर निसर्ग संकट देतो...





एका जवळच्या पत्रकाराने खासगीत महाजनांना विचारलं, चाणक्याने असे कुठे म्हटलंय? त्यावर महाजन म्हणाले, अरे चाणक्य मी तरी कुठे वाचलंय? ते कोणीच वाचलेले नसतंय!

# निवडणूक लोकसभेची अग्नीपरीक्षा मात्र काळे, नरोटेंची



**सोलापूर : सोलापूर लोकसभेची निवडणूक भाजप आणि काँग्रेसच्या दृष्टीने प्रतिष्ठेची ठरत आहे. आजी-माजी आमदारांबरोरच भाजप आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष या दोघांसाठीही ही निवडणूक अग्नीपरीक्षा ठरणार आहे. या दोघांची कामगिरी किती दमदार होणार, आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या पाठिशी मताधिक्य वळविण्यात हे कितपत यशस्वी होतात, यावर त्यांचे राजकीय करिअर अवलंबून असेल.**

## धनगर समाजाची मते खेचण्याचे दोघांपुढे आव्हान

नरेंद्र काळे आणि चेतन नरोटे हे दोघेही धनगर समाजाचे आहेत. मराठा आंदोलनाबरोबर धनगर समाजानेही आरक्षणासाठी आंदोलन केले होते. तोही समाज भाजपवर नाराज असल्याचे बोलले जाते. नरेंद्र काळे यांच्यावर ही नाराजी दूर करण्याचे आव्हान आहे तर धनगर समाजाची मते काँग्रेसकडे वळवण्याचे आव्हान नरोटे यांच्यापुढे आहे. यात कोण बाजी मारणार हे निकालानंतर स्पष्ट होईल!





भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते आणि काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांच्यात प्रचारादरम्यान अनेक मुद्दे उपस्थित होत आहेत. अद्याप ही निवडणूक शहराच्या विकासाच्या मुद्यांवर आली नाही. निवडणूक शहर विकासाच्या मुद्यावर आल्यावर मात्र काळे आणि नरोटे यांची खऱ्या अर्थाने कसोटी लागेल असे दिसते. भाजपाने मोठा गाजावाज करत सोलापूरला स्मार्टसिटी घोषित केली. मात्र स्मार्टचा भोंगळ कारभार, निकृष्ट दर्जाची कामे, दुहेरी जलवाहिनेचे टेंडर देताना झालेला गोंधळ, आपल्याच नगरसेवकांना दिलेल्या कामांचे टेंडर याची पोलखोल काँग्रेसकडून पर्यायानं महाविकास आघाडीकडून होऊ शकते. अभ्यासू आणि अनुभवी आमदार प्रणिती शिंदे या सोलापुरातील प्रचारदरम्यान या मुद्यांवर आक्रमक होत तुटून पडतील. यावर सत्ताधाऱ्यांना उत्तरं देताना नाकीनऊ येऊ शकते. विशेषत्वे, पेटलेल्या पाण्याचा मुद्दा महाविकास आघाडीकडून प्रचारादरम्यान अत्यंत लक्षवेधी केला जावू शकतो. पाण्यावरुन संतापलेल्या नागरिकांची मते आपल्याकडे वळवून घेण्याचा काँग्रेसचा पर्यायानं महाविकास आघाडीचा ठोस प्रयत्न राहील असे दिसते.

याशिवाय महापालिकेत भाजपाची पाच वर्ष सत्ता असताना त्यांना व्यवस्थित कारभार करता आला नाही, असा आरोप काँग्रेसकडून वारंवार केला जात आहे. त्यालाही काळे यांनाच तोंड द्यावे लागणार आहेत. काळे हे युवा शहराध्यक्ष आहेत. ते आक्रमकही आहेत. मोठ्या निवडणुकीच्या ऐन तोंडावर त्यांच्याकडे शहराध्यक्षपद देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचा मोठा कस लागणार आहे. याशिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे आ. सुभाष देशमुख आणि विजयकुमार देशमुख या दोघांना एकत्रित आणून प्रचाराचे नियोजन करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. या सर्व दिव्य परिस्थितीतून काळे कसे नियोजन करणार, काँग्रेसच्या विविध प्रश्नांच्या भडीमाराला कसे सामोरे जाणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

दुसरीकडे काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे हे शिंदे पिता-कन्या यांचे कट्टर समर्थक समजले जातात. भाजपाची सत्ता येण्यापूर्वी महापालिकेत काँग्रेसची सत्ता होती. त्यांच्या काळातही पाणीपुरवठा विस्कळीत होता, हाच मुद्दा भाजपकडून उलटवला जाऊ शकतो, यावेळी नरोटे यांना उत्तर द्यावे लागणार आहे. याशिवाय काँग्रेसची बूथ यंत्रणा भाजपाऐवढी सक्षम नाही, ती यंत्रणा लावण्यात नरोटे यांचा कस लागणार आहे. काँग्रेस पदाधिकाऱ्यांमध्ये होणारे लहान-सहान वादही लागलीच चव्हाट्यावर येतात ते थोपवण्याचे काम नरोटे यांना करावे लागणार आहे.

चेतन नरोटे केवळ शिंदे पिता-कन्येसोबतच फिरतात. पक्षाच्या संघटनात्मक पातळीवरील मोर्चेबांधणीत ते कमी पडत आहेत, असा खुद्द काँग्रेसच्याच पदाधिकाऱ्यांमध्ये बोलबाला आहे. याकडेही नरोटे यांना लक्ष द्यावे लागणार आहे.

सध्या सुशीलकुमार शिंदे यांनी यंत्रणा हलवण्यास सुरूवात केली आहे, त्यांना दिलीप माने, महेश कोठे यांची साथ मिळणार आहे. यामध्ये नरोटे आता आपला किती वाटा देतात हे महत्वाचे ठरणार आहे.